Vol II Issue V Nov 2012

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

# Monthly Multidiciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 5, Nov. 2012
**ISSN:-2231-5063**

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

GRT

# *यशोदाबाई जोशी – एक कर्तृत्ववान स्त्री*

*गोविंद मा. तिरमनवार*

सहाय्यक प्राध्यापक – इतिहास  स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय,
नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती

*सारांश :*

आधुनिक भारताच्या इतिहासात विदर्भातील अनेक महिलांनी सामाजिक सुधारणेच्या व स्वातंत्र्य संग्रामाच्या क्षेत्रात महत्वाची कामगिरी बजाविली. अमरावती येथील सुप्रसिद्ध वकील सर मोरोपंत जोशी ज्यांच्या पत्नी लेडी यशोदाबाई उर्फ अक्कासाहेब जोशी या विदर्भात स्त्री उन्नतीचे विचार व आचार प्रस्तुत करणारी प्रथम महिला होय. राजकिय क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या त्या विदर्भातील पहिल्या महिला होत्या. सुधारणावादी दृष्टिकोन ठेवून यशोदाबाईंनी विदर्भातील स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केले. स्त्रियांमध्ये राजकिय जागृतीही घडवून आणली. यशोदाबाईंनी स्वत इंगज्री शिक्षण घेतले. आणि आपल्या मुलींनाही उच्चशिक्षण दिले. मुलींच्या लग्नाची वयोमर्यादाही वाढविली आणि समाजासमोर महिला उन्नतीचा आदर्श प्रस्तुत केला. इ. स. 1892 मध्ये अमरावती येथे वनिता समाजाची स्थापना करून महिलांना उपयुक्त

*प्रस्तावना :*

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून विदर्भात समाजिक प्रबोधनाला प्रारंभ झाला. पाश्चात्य शिक्षणाची सुरूवात झाली. मुलींसाठी शाळा स्थापन झाल्या. पश्चिम महाराष्ट्रात सुरू झालेल्या वैचारिक प्रबोधनाचे वारे विदर्भात पसरू लागले. समाज सुधारणेचा विचार विदर्भात सुशिक्षित व सबुद्ध वर्गात मूळ धरू लागला. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात स्त्रीयांच्या उन्नतीसाठीचे कार्य करण्यासाठी काही महिला पुढे आल्या. विदर्भातील महिलांमध्ये सामाजिक प्रबोधनातून राजकिय जाणिवेचा उदय झाला.[1] विदर्भातील अनेक महिलांनी सामाजिक व राजकिय क्षेत्रात महत्वाची कामगिरी केली.

यशोदाबाई जोशी या विदर्भात स्त्री उन्नतीचे विचार व आचार प्रसुत करणाऱ्या प्रथम महिला होत. राजकिय क्षेत्रातही पदार्पण करणाऱ्या त्या पहिल्या वैदर्भीय महिला म्हणून त्यांचे कार्य महत्वपूर्ण आहे. यशोदाबाईंचा जन्म इ. स. 1868 मध्ये झाला.[2] विदर्भातील स्त्री उन्नतीच्या क्षेत्रात सुधारणा करून त्या राबविणारे अमरावती चे सुप्रसिद्ध वकील मोरोपंत जोशी यांच्या यशोदाबाई या पत्नी होत लग्नापूर्वी यशोदाबाईंचे शालेय शिक्षण झालेले नव्हते. यशोदाबाई जोशी आणि मोरोपंत जोशी या दांपत्याने महिला उन्नतीच्या दृष्टिने सुधारणा कार्याला आपल्या घरापासूनच सुरूवात केली.[3] मोरोपंताच्या प्रेरणेने त्यांनी शिक्षणाला सुरूवात केली. इंग्रजी लिहितावाचता यावे म्हणून फ्रेंच होली क्रॉस कान्व्हेंटमधील एक शिक्षिका सूझन त्यांना शिकविण्यासाठी घरी येवु लागली. या शिक्षिकेकडून यशोदाबाई इंग्रजी लिहण्या व वाचण्याबरोबरच इतरही काही गोष्टी शिकल्या. याविषयी यशोदाबाई आपल्या आत्मचरित्रात लिहतात. ''गृहिणी म्हणून येणारी सर्व कामे तत्परतेने करूनही लोकसेवेची कामे स्त्रीला करता येतील हा विचार दृढ करण्यात, पती बरोबरच सूझनची मदत झाली.''[4]

यशोदाबाई जोशींचा समाजोन्मुख दृष्टिकोण तयार होण्यात न्या. रानडे व त्यांच्या पत्नी रमाबाई यांनाही त्या काही प्रमाणात श्रेय देतात. इ. स. 1888 पासून जोशी कुटुंबाचा न्या. रानडे, डॉ. भांडारकर, डॉ. भाटवडेकर, विष्णू मोरेश्वर भिडे, इत्यादी पुण्याकडील सुधारक मंडळीचा जवळचा संबंध प्रस्थापित होऊ लागला. जोशी पतीपत्नी दरवर्षी उन्हाळ्यात महाबळेश्वर व पुण्याला जात. त्यावेळी पुण्यामुंबईच्या अनेक लहान मोठ्या सार्वजनिक संस्थांचे कार्य त्यांना पाहायला मिळे. मोरोपंत हे कर्ते सुधारक असल्यामुळे पुण्या–मुंबईकडे होत असलेल्या कामाच्या धर्तीवर विदर्भातही काम सुरू करण्यास ते उत्सुक असत. त्यामुळे त्यांच्या सार्वजनिक कार्याला विशेष चालना मिळे व त्या कार्यात ते यशोदाबाईंनाही प्रोत्साहन देत.[5]

यशोदाबाईंचा दृष्टिकोन सुधारणावादी होता. विदर्भातील स्त्रियांची स्थिती सुधारली ती काही अंशी यशोदाबाईंच्या सुधारणांमुळेच कारण त्यांनी विदर्भात प्रथम महिला जागृती केली. स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रचार करणे, व्याख्यान ऐकण्याकरिता स्त्रियांनी जाणे, भिन्न–भिन्न विषयातील ज्ञान संपादन करण्यासाठी स्त्रियांनी जाणे स्त्रियांनी शिक्षण घेणे. मुलींच्या विवाहाच्या वयोमर्यादा वाढविणे, विधवांची परिस्थिती सुधारणे, स्त्रियांकरिता आरोग्य आणि मनोरंजन करणाऱ्या संस्था काढणे इत्यादी ध्येये यशोदाबाईंनी आपल्या डोळ्यांसमोर ठेवलेली होती. त्याच्या पूर्तीकरीता यशोदाबाई सतत झटल्या त्यांनी पहिल्या प्रथम अमरावतीत 'वनिता – समाजाची' इ. स. 1892 मध्ये स्थापना केली.[6]

यशोदाबाई, यमुताई चिटणविस, सीताबाई सबनीस, येसूताई अभ्यंकर, राधाबाई मुधोळकर व द्वारकाबाई वैद्य या वनितासमाजाच्या आद्य संस्थापिका व पहिल्या कार्यकारिणीच्या सदस्य होत्या. मल्हार खंडेराव उर्फ दादासाहेब, चिटणविस यांनी या कामी मोलाचे सहकार्य दिले. प्रारं ीच्या 5,6 वर्षात चिरणणिस यांच्या घरीच वनिता समाजाचे काम चाले. या संस्थेत येण्यास कोणी बिचकू नये, म्हणून प्रथम दुपारी कीर्तने आयोजित केली जात. कीर्तनातून स्त्रियांची कर्तव्ये, परिस्थितीनुरूप कामाची गरज वगैरे विषय मांडले जात. या संस्थेत जातपात किंवा धर्मभेद मानला जात नसे. शिवणकाम, विणकाम यांचेही शिक्षण दिले जाई.

हळूहळू भारताच्या या राजकिय क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींची माहिती तसेच राष्ट्रिय सभेच्या कार्याची माहितीही स्त्रियांना करून दिली जाऊ लागली.[7] याशिवाय या संस्थेने बाल कल्याण, आयांना शिक्षण आणि आजारी लोकांची शुश्रृषा ही उद्दिष्टे आपल्या डोळ्यांसमोर ठेवलेली होती. काही वर्षानंतर या संस्थेचे रूपांतर 'लेडीज क्लबमध्ये' करण्यात आले. श्रीमती माणिकबाई भिडे या मोरोपंत व यशोदाबाईंच्या कन्येने काही काळानंतर या संस्थेचे पुनरूज्जीवन केले.

महिलांच्या जागृतीत सर मोरोपंत जोशी आणि यशोदाबाई किंवा संपूर्ण जोशी परिवार सर्वाधिक प्रयत्नशील होता. स्वत मोरोपंतांना शिक्षणाप्रती अत्यंत प्रेम होते. ते स्वत जरी शिक्षणासाठी विदेशात गेल्यामुळे बहिष्कृत झाले तरी देखील त्यांनी आपली कन्या नागुताई विवाहानंतरच्या राणी राजवाडे हीस उच्चशिक्षणासाठी इंग्लंडला पाठविले. उच्च शैक्षणिक पदव्या घेऊन इ.स. 1922 मध्ये ती परत आली.  लग्नानंतर त्यांचा संबंध मुंबईच्या सुशिक्षित महिलांशी आला. तेथे त्या तिसऱ्या वर्षी महिला परिषदेच्या अध्यक्षा बनल्या व चौदा वर्ष पावेतो महिला वर्गाची सेवा केली. या प्रकारे विदर्भातील एका सुशिक्षित कन्येने मुंबईत जाऊन महिला जागृतीचे कार्य केले हे विदर्भाच्या दृष्टीने गौरवास्पद आहे.[8]

इ. स. 1897 साली अमरावतीला अधिवेशन भरले. ते घडवून आणण्यात दादासाहेब खापर्डे, मोरोपंत जोशी यांचा पुढाकार होता.  साहजिकच  त्यांच्या घरातील महिला या कार्याला हातभार लावण्यास पुढे सरसावल्या यशोदाबाईंनी यावेळी विदर्भात तयार होणाऱ्या कला कुसरीच्या वस्तूंचे प्रदर्शन अधिवेशन स्थळी वनिता समाजाच्या सदस्यांच्या व इतर काही मैत्रिणींच्या मदतीने आयोजित केले. यशोदाबाईंनी स्वतच्या पुढाकाराने मांडलेल्या प्रदर्शनची उपस्थितांनी कौतुक केले. यावेळेपासून पुढे प्रत्येक अधिवेशनाच्या वेळी हस्तकलावस्तूंचे प्रदर्शन भरविण्याचा उपक्रम सुरू झाला. या अमरावती येथील अधिवेशनाला प्रेक्षक व श्रोत्या म्हणून यशोदाबाईंसह अनेक स्त्रिया उपस्थित होत्या. तेव्हापासून पुढे अनेक वर्ष यशोदाबाई राष्ट्रीय सभेच्या वार्षिक अधिवेशनाला सातत्याने हजर राहू लागल्या.[9]

इ. स. 1905 सालच्या राष्ट्रीय सभेच्या बनारस अधिवेशनात स्वदेशीचा ठराव पारीत झाला. त्या अधिवेशनाला यशोदाबाई उपस्थित होत्या. त्यावेळी स्वदेशीच वस्तू वापरण्याची गरज स्त्रियांच्या मनावर बिंबविण्याचे काम जोमाने करायचे असा त्यांनी निर्धार केला. याबाबत यशोदाबाई म्हणल्यात ''आमच्या घरात स्वदेशींचे व्रत आम्ही कैक वर्षापासून सुरू केलेलेच होते. या काँग्रेसच्या अधिवेशनामुळे सर्वांनी स्वदेशी वस्तू वापराव्या याबाबत वऱ्हाडातील स्त्रियांमध्ये जोरात प्रचारकार्य करण्याचा मी निश्चय केला. स्वदेशीचे व्रत  पाळण्यात आमच्या मुलांनीही आमच्याशी खुषीने सहकार्य केले.'' स्वदेशीच्या प्रचाराची कामे वनिता समाजातील स्त्रियांही उत्साहाने करू लागल्या. त्यासाठी अमरावती, अकोला, यवतमाळ या जिल्हयात स्त्रियांच्या समित्यांही नेमण्यात आल्या. सभा, भाषणे याद्वारा स्त्रियांची मानसिकता तयार करण्यात आली. यशोदाबाई स्वत मानसिकता तयार करण्यात आली. यशोदाबाई स्वत व्याख्याने देण्यास जाऊ लागल्या.[10]

एकूणच यशोदाबाई जोशी, यांनी सामाजिक व स्वातंत्र्यसंग्रामाच्या क्षेत्रात केलेले कार्य अत्यंत महत्वाचे असे आहे. यशोदाबाईंनी सुधारणावादी दृष्टिकोन ठेवून विदर्भातील महिलांच्या उन्नतीसाठी कार्य केले. त्यांच्या कार्यामुळे विदर्भातील स्त्रियांची स्त्रिती सुधारली. यशोदाबाईंच्याच कार्याने विदर्भातील महिलांना मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्यसंग्रामाच्या कार्यात सहभागी होण्याची प्रेरणा मिळाली. यशोदाबाईंना सुधारणावादी कार्याची प्रेरणा आपल्या पतीकडून मिळाली. भारताच्या इतर भागातील स्त्रियांप्रमाणेच विदर्भातील यशोदाबाईंनी आपले कर्तुत्व व क्रियाशीलता स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात सिद्ध केली.

*संदर्भ :*

1.दमयंती पाठक, भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात वैदर्भीय महिलांचे योगदान, मंगेश प्रकाशन, नागपूर, 2003, पृ. 29.
2.श्याम येडेकर, भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांचे योगदान – महाराष्ट्र,  सौ. मंगला येडेकर, कोल्हापूर, 2007, पृ. 124.
3.दमयंती पाठक, उपरोक्त, पृ. 253.
4.यशोदाबाई जोशी, आमचा जीवन प्रवास, व्हिनस प्रकाशन पुणे, 1965 पृ. 46.
5.कित्ता पृ. 32, दमयंती पाठक, उपरोक्त पृ. 31.
6.श. गो. कोलारकर , आधुनिक विदर्भाचा इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपूर, 2003, पृ. 576. नि. आ. वक्राणी, आधुनिक विदर्भाचा इतिहास, मंगेश प्रकाशन,नागपूर, 2003, पृ. 225.
7.भि. दे. कारंजकर,अमरावती शहराचा इतिहास, अमरावती, 1978.
8.नि. आ. वास्काणी, उपरोक्त, पृ. 225.
9.दमयंती पाठक, उपरोक्त, पृ. 32.
10.कित्ता,  पृ. 34.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net